महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ १४ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २२९ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## संपादकीय

### कॉपीमुक्त परीक्षा की केवळ कारवाईपुरती शिस्त?

बारावीच्या परीक्षेच्या पहिल्याच दिवशी कन्नड तालुक्यातील जैतापूर येथील प्रकाराने राज्याच्या शिक्षण व्यवस्थेच्या जखमेवर बोट ठेवले आहे. सीसीटीव्ही फुटेजमुळे सामूहिक कॉपीचा प्रकार उघडकीस आला, १९ जणांवर कारवाई प्रस्तावित झाली आणि “उपरवाला सब देख रहा है” असा इशाराही देण्यात आला. ही कारवाई निश्चितच आवश्यक आणि स्वागतार्ह आहे. मात्र प्रश्न इतक्यावर थांबत नाही. राज्यात अनेक ठिकाणी परीक्षेदरम्यान अशा स्वरूपाचे गैरप्रकार उघड किंवा दडपून घडत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. कुठे सामूहिक कॉपी, कुठे पर्यवेक्षकांची उदासीनता, तर कुठे दबावाखाली डोळेझाक—हे चित्र नवीन नाही. फरक इतकाच की, एखाद्या ठिकाणी सीसीटीव्हीमुळे प्रकार उघड होतो आणि तिथे कठोर कारवाई होते; पण उर्वरित ठिकाणी “सगळं सुरळीत” असल्याचा देखावा कायम राहतो. परीक्षा म्हणजे केवळ प्रश्नपत्रिका आणि उत्तरपत्रिका नव्हे; ती संपूर्ण व्यवस्थेची नैतिक परीक्षा असते. विद्यार्थी का कॉपी करतात, याचा थंड डोक्याने विचार केला तर केवळ “चुकीची सवय” एवढेच कारण पुढे येत नाही. गुणांचे वाढलेले महत्त्व, पालकांची अपेक्षा, भवितव्याची भीती आणि व्यवस्थेने निर्माण केलेला प्रचंड दबाव—या साऱ्यांचा परिणाम विद्यार्थ्यांच्या वर्तनावर होतो. मात्र याचा अर्थ गैरप्रकारांना माफी देणे असा होत नाही. आज राज्यात कडक कारवाईचा संदेश दिला जातो आहे, हे योग्यच आहे. पण केवळ कारवाई करून प्रश्न सुटणार आहे का? परीक्षा केंद्रातील कर्मचारी बदलणे, निलंबनाचे प्रस्ताव, शिस्तभंग—हे तात्कालिक उपाय आहेत. दीर्घकालीन उपाय म्हणजे परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता, पर्यवेक्षकांची जबाबदारी निश्चित करणे, आणि विद्यार्थ्यांवरचा अनाठायी मानसिक ताण कमी करणे. कॉपीमुक्त परीक्षा हवी असेल तर ‘भीती’पेक्षा ‘विश्वास’ अधिक मजबूत करावा लागेल. विद्यार्थ्यांना हे पटवून देणे गरजेचे आहे की, परीक्षा म्हणजे आयुष्याचा शेवटचा टप्पा नाही. शिक्षक, प्रशासन आणि पालकांनी मिळून असा वातावरण तयार केले पाहिजे की, प्रामाणिक प्रयत्नाला प्रतिष्ठा मिळेल आणि फसवणुकीला सामाजिक मान्यता मिळणार नाही. जैतापूरची घटना हा इशारा आहे—फक्त त्या एका केंद्रासाठी नाही, तर संपूर्ण राज्यासाठी. सीसीटीव्ही सर्वत्र आहेच, पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे व्यवस्था स्वतःकडे प्रामाणिकपणे पाहण्याची तयारी ठेवते का, हाच खरा प्रश्न आहे. कारवाईचा धाक आवश्यक आहे, पण त्यासोबत मूल्याधिष्ठित शिक्षण आणि संवेदनशील प्रशासनाची जोड मिळाली, तरच “सामूहिक कॉपी” ही बातमी इतिहासजमा होईल.

# एकनाथ शिंदे भाकरी फिरवणार ?



## सुमार कामगिरी करणाऱ्या मंत्र्यांना डच्चू

## नव्या चेहऱ्यांना संधी? - एकनाथ शिंदेंचा निर्णय

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १३**

**मुंबई : जिल्हा परिषद आणि नगरपंचायत निवडणुकांमध्ये एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला अपेक्षित मोठे यश मिळवता आले नाही. भाजपा आणि अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या पाठोपाठ शिंदेंची शिवसेना तिसऱ्या क्रमांकावर राहिली. या निकालानंतर उपमुख्यमंत्री शिंदे ‘भाकरी फिरवण्याच्या’ तयारीत असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.**

लोकसभा निवडणुकीपासून ते पालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांपर्यंत पक्षाला मिळालेले यश-अपयश लक्षात घेऊन शिंदे मोठा निर्णय घेण्याची शक्यता आहे. कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र वगळता इतर जिल्ह्यांतील मंत्र्यांना नुकत्याच झालेल्या निवडणुकांमध्ये समाधानकारक कामगिरी करता आलेली नाही. यावरून शिंदेंनी ३ ते ४ मंत्र्यांचे कान टोचले असून, लवकरच मंत्रिमंडळात बदल करून त्यांच्या जागी नव्या चेहऱ्यांना संधी देण्याची तयारी सुरू असल्याचे समजते. दरम्यान, निवडणूक निकालानंतर शिंदेंनी शिवसेनेच्या सर्व जिल्हासंपर्क प्रमुख, नेते आणि सचिवांना संघटना बांधणीसाठी व्यापक दौरे करण्याच्या सूचना दिल्या आहेत. निवडणुकांमध्ये आपण कुठे आणि का कमी पडलो, याची सखोल कारणमिमांसा करण्याचे निर्देशही देण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

**■ मुंबई: आगामी राजकीय समीकरणे आणि नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकांचे निकाल पाहता, शिवसेना मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आता पक्षात मोठे फेरबदल करण्याच्या तयारीत आहेत. 'भाकरी फिरवण्याची' वेळ आली असल्याचे संकेत देत शिंदेंनी सुमार कामगिरी करणाऱ्या ३ ते ४ मंत्र्यांचे कान टोचले आहेत.**

**■ लोकसभा, जिल्हा परिषद आणि नगरपालिका निवडणुकांमध्ये ज्या मंत्र्यांना आपल्या मतदारसंघात किंवा सोपवलेल्या जबाबदारीत अपेक्षित यश मिळवता आले नाही, त्यांचे मंत्रिपद धोक्यात आले असून त्यांच्या जागी नव्या आणि कार्यक्षम चेहऱ्यांना संधी मिळण्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे.**

### ■ 'मिशन मोड'वर काम करण्याचे आदेश

निवडणुकीतील त्रुटी शोधण्यासाठी आणि संघटना पुन्हा मजबूत करण्यासाठी उपमुख्यमंत्र्यांनी सर्व जिल्हासंपर्क प्रमुख, नेते आणि सचिवांना राज्यव्यापी दौरे करण्याचे आदेश दिले आहेत. आपण कुठे कमी पडलो आणि पराभवाची नेमकी कारणे काय, याचा सविस्तर अहवाल सादर करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. युतीच्या राजकारणात कल्याण-डोंबिवली आणि ठाणे या पट्ट्यातच उपमुख्यमंत्र्यांची शक्ती अधिक खर्च झाल्याने मुंबईकडे दुर्लक्ष झाले, असेही विश्लेषण राजकीय वर्तुळात केले जात आहे.

## एसीबीची मोठी कारवाई

# लाच घेताना एफडीएचा लिपिक अटकेत

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १३**

**मुंबई :** मंत्रालयात एसीबीनं मोठी कारवाई केली आहे. अन्न व औषध प्रशासन विभागातील क्लर्कला लाच घेताना अटक करण्यात आली आहे. राजेंद्र ढेरंगे असं अटक करण्यात आलेल्या आरोपीचं नाव आहे. मेडिकलचा निलंबित परवाना पूर्वरत करुन देण्यासाठी मागितली 50 हजारांची लाच मागितली होती. तडजोडीअंती 35 हजार रुपयांची लाच स्वीकारताना अटक करण्यात आली आहे. मंत्रालयातल्या दुसऱ्या मजल्यावर ही कारवाई झाल्याने चर्चांना उधाण आले आहे. या घटनेनंतर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ (Harshvardhan Sapkal ) यांनी सरकारवर जोरदार टीका केली आहे. मंत्रालयात अन्न व औषध प्रशासन विभागातील क्लर्कला लाच घेताना अटक करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. मेडिकलचा निलंबित परवाना पूर्वरत करुन देण्यासाठी क्लर्कने 50 हजार रुपयांची लाच मागितली होती. तडजोडीअंती 35 हजार रुपयांची लाच स्वीकारताना अटक करण्यात आली आहे. या घटनेनंतर विविध चर्चांना उधाण आलं आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी महाभ्रष्ट महायुती सरकारच्या कारकिर्दीत मंत्रालयात खुलेआम लाचखोरी आणि कमिशनखोरी सुरू असल्याची टीका केली आहे.

तक्रार आल्यानंतर मंत्री नरहरी शिरवळ यांच्या कार्यालयात अँटी करप्शन ब्युरोचे सहा अधिकारी पोहोचले होते तक्रार आल्यानंतर मंत्री नरहरी शिरवळ यांच्या कार्यालयात अँटी करप्शन ब्युरोचे सहा अधिकारी पोहोचले होते. कारवाई करताना झिरवळ यांचं कार्यालय पूर्ण ताब्यात घेतलं. तपास झाल्यानंतर मग या संबंधित क्लर्क ला ताब्यात घेऊन गेले. त्यानंतर कार्यालय उघडण्यात आलं. दरम्यान, या घटनेवर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मंत्रालयात एका कॅबिनेट मंत्र्यांच्या कार्यालयात एसीबीने सापळा रचून एका लाचखोर अधिकाऱ्याला ताब्यात घेतल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. महाभ्रष्ट महायुती सरकारच्या कारकिर्दीत मंत्रालयात खुलेआम लाचखोरी आणि कमिशनखोरी सुरू असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. जनतेची कामे पैशाशिवाय होत नाहीत, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे, ही अत्यंत गंभीर बाब आहे. मुख्यमंत्र्यांनी संबंधित प्रकरणाची दखल घेऊन जनतेला माहिती द्यावी आणि लाचखोर मंत्र्याला पदावरून हटवावे, भ्रष्टयुती असे म्हणत हर्षवर्धन सपकाळ यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे.

# कल्याण तालुक्यात घरकुल योजनेची घरे रखडली

## बांगरवाडीतील आदिवासी लाभार्थ्यांना ग्रामपंचायतीच्या चकरा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १३**

**कल्याण :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानातील अतिशय महत्त्वाचा घटक असलेल्या प्रधानमंत्री आवास योजनेच्या उद्दिष्टांचा विचार करता, कल्याण तालुक्यात घरकुल योजनेतील अनेक घरे रखडल्याचे वास्तव समोर येत आहे. शासकीय अधिकारी व कर्मचारी यांची उदासीनता, तांत्रिक अडचणी तसेच काही ठिकाणी मानवनिर्मित कारणांमुळे ही घरे पूर्ण होऊ शकलेली नाहीत. याचे ठळक उदाहरण कुंदे ग्रामपंचायत अंतर्गत बांगरवाडी येथील आदिवासी लाभार्थ्यांचे आहे. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा–२ अंतर्गत बबन शनिवार खोडका आणि शनिवार बबन खोडका यांना दि. १० सप्टेंबर २०२४ रोजी घरकुल मंजूर झाले आहे. घरकुलाचे बांधकाम चौकटीच्या वरपर्यंत झाले असले तरी, जिल्हा परिषद शाळेला दिलेली वीज लाईन या लाभार्थ्यांच्या घरावरून जात असल्याने पुढील बांधकाम गेल्या कित्येक महिन्यांपासून रखडले आहे. लाईटची वायर एका बाजूला न केल्याने पत्रे व वरचे बांधकाम करता येत नसल्याचे लाभार्थ्यांचे म्हणणे आहे. या समस्येबाबत ग्रामपंचायतीकडे वारंवार चकरा मारूनही संबंधित ग्रामपंचायत अधिकारी भेटत नसल्याची तक्रार बबन खोडका व अनंता खोडका यांनी केली आहे. ही केवळ उदासीनतेची एक बाजू असून, दुसरीकडे अनेक ठिकाणी घरकुल मंजूर होऊनही एकही हप्ता न मिळणे, केवायसी प्रलंबित राहणे, पहिला हप्ता मिळून पुढील हप्ते न मिळणे, वर्ककोड न आल्याने मस्टर न पडणे अशा तांत्रिक अडचणीही लाभार्थ्यांसमोर उभ्या आहेत.

रायते, निंबवली, कांबा, मानिवली, गोवेली आदी गावांमध्येही अशीच स्थिती दिसून येत असून, अनेक लाभार्थ्यांनी घरकुल मंजूर होऊनही निधी परत करण्याची तयारी दर्शवली आहे. बहुतांश ग्रामपंचायतींमध्ये कमी-अधिक प्रमाणात हीच परिस्थिती असल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद व कल्याण पंचायत समिती याबाबत कोणत्या ठोस उपाययोजना करते, यावरच घरकुल योजनेंतील उद्दिष्टे पूर्ण होणार की नाही, हे अवलंबून असल्याची चर्चा नागरिकांमध्ये होत आहे.

## थोडक्यात महत्वाचे

### फेरिवाल्यांनी गिळले टिटवाळ्यातील पदपथ

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १२**

**कल्याण :** कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील काही मोजके प्रभाग साहाय्यक आयुक्त फेरीवाल्यांवर कठोर कारवाई करत आहेत. त्यामुळे काही ठराविक रस्ते, पदपथ मोकळे दिसत आहेत. बाकी कल्याण रेल्वे स्थानक, टिटवाळा रेल्वे स्थानक आणि अंतर्गत भागातील रस्ते, पदपथ आणि डोंबिवली पूर्व ग प्रभागातील रेल्वे स्थानक भागातील रस्ते, पदपथ पालिकेने फेरीवाल्यांना आंदण म्हणून दिले आहेत का, असे प्रश्न नागरिक करत आहेत. या रस्त्यांवरून संध्याकाळच्या वेळेत नागरिकांना चालणे शक्य होत नाही. यापूर्वीचे आयुक्त फेरीवाले, बेकायदा बांधकामांच्या विषयावर अतिशय तत्पर आणि कठोर होते. आताचे आयुक्त अभिनव गोयल आदेश देण्यांव्यतिरिक्त फेरीवाला, बेकायदा चाळी, इमारती विषयांवर मौन पाळून असल्याने तक्रारदार नागरिक तीव्र नाराजी व्यक्त करत आहेत. शहरातील नागरिकांना चालण्यासाठी असलेले पदपथ, रस्ते फेरीवाल्यांनी ठेले लावून बंदिस्त केले आहेत. तरीही पालिका अधिकारी या फेरीवाल्यांवर कारवाई करत नसल्याने नागरिक आश्चर्य व्यक्त करत आहेत. डोंबिवली पूर्वेतील डॉ. रॉथ रस्ता, उर्सेकरवाडी गल्ली, रामनगर वाहतूक पोलीस कार्यालय रस्ते संध्याकाळी चार वाजल्यापासून ते रात्री उशिरापर्यंत फेरीवाल्यांनी गजबजलेले असतात. दीड ते दोन तास मुंबईतून लोकलने धक्केबुक्के खात, रेटारेटी सहन करत घरी परतलेला डोंबिवलीकर डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानकाच्या बाहेर पडला की त्याला फेरीवाले आणि ग्राहकांचे धक्केबुक्के खात घरचा रस्ता धरावा लागतो. या भागातून चालणे नागरिकांना अवघड होते. ग प्रभागातील फेरीवाला हटाव पथकातील कामगार पालिका आवारात वडापाव खात, चहा पित बसलेले असतात. काही शिवसेना शाखेत आपल्या नेत्याची कामे करण्यात मग्न असल्याची चर्चा आहे.

# केडीएमसीच्या ‘त्या’ नगरसेवकांची कोकण आयुक्तांकडे नोंदणी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १३**

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या निवडणुकीनंतर रंगलेले राजकीय नाट्य आता नव्या वळणावर येऊन ठेपले आहे. निवडणूक निकालानंतर ‘नॉट रीचेबल’ असलेले शिवसेना ठाकरे गटाचे तीन नगरसेवक अचानक कोकण भवनात हजर झाले. निकाल लागल्यापासून हे नगरसेवक कुठे होते आणि कोणाच्या संपर्कात होते, याबाबत राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू होती. आता त्यांनी आपल्या नगरसेवक पदाची नोंदणी केली असली तरी ते ठाकरे गटासोबत आहेत की नाही, याबाबतचा सस्पेन्स अद्याप कायम आहे.

कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या निवडणुकीत शिवसेना ठाकरे गटाचे एकूण ११ नगरसेवक निवडून आले होते. मात्र मतमोजणीनंतर राहुल कोट, स्वप्नाली केणे आणि मधुर म्हात्रे हे तीन नगरसेवक संपर्काबाहेर होते. अखेर २८ दिवसांच्या प्रतीक्षेनंतर या तिघांनी कोकण विभागीय आयुक्तालयात जाऊन आपल्या सदस्यत्वाची नोंदणी केली आहे. विशेष म्हणजे राहुल कोट आणि स्वप्नाली केणे हे मूळचे मनसेचे कार्यकर्ते असून त्यांनी ठाकरे गटाच्या मशाल चिन्हावर निवडणूक लढवली होती. त्यामुळे त्यांच्या पुढील भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

शिवसेना ठाकरे गटाचे सुरुवातीला केवळ ७ नगरसेवक एकत्र आल्याने तांत्रिकदृष्ट्या गट स्थापन करण्यात अडचणी येत होत्या. महासभेत व्हीप बजावण्यासाठी आवश्यक संख्याबळ नसल्याने पक्षाची कोंडी झाली होती. दरम्यान किर्ती ढोणे या नगरसेविका पक्षाच्या संपर्कात आल्या आणि त्यांनी महापौर-उपमहापौर निवडणुकीत सहभाग घेतला. त्यामुळे ठाकरे गटाची संख्या ८ वर पोहोचून गट स्थापन झाला. मात्र उर्वरित तीन नगरसेवकांनी अद्याप आपली राजकीय दिशा स्पष्ट केलेली नाही.

या संपूर्ण प्रकरणावर ठाकरे गटाचे गटनेते उमेश बोरगावकर यांनी भूमिका मांडली आहे. या तिघांनी सदस्यत्वाची नोंदणी केली असली तरी आम्ही त्यांना आमच्या गटात सामील करून घेतलेले नाही, असा दावा त्यांनी केला. मात्र यामुळे नवा प्रश्न निर्माण झाला आहे की, गटाने त्यांना स्वीकारले नाही की हे नगरसेवक स्वतःहून पक्षात येण्यास तयार नाहीत.

मशाल चिन्हावर निवडून येऊनही पक्षाच्या प्रक्रियेपासून दूर राहिल्याने या तीन नगरसेवकांना ठाकरे गटाकडून नोटीस बजावण्यात आली आहे. पक्षाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी त्यांच्यावर नेमकी कोणती कारवाई होणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# एमएमआरमध्ये दहा नव्या जलमार्गांवर धावणार जल मेट्रो

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १३**



**मुंबई :** मुंबई महानगर प्रदेशातील (एमएमआर) वाहतूक कोंडी दूर करून अंतर्गत वाहतूक व्यवस्था मजबूत करण्यासाठी विविध रस्ते प्रकल्प राबवले जात आहेत. एमएमआरला मोठा समुद्रकिनारा लाभला असून, वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडवण्यासाठी जलवाहतुकीला चालना देण्याचा निर्णय महाराष्ट्र सागरी मंडळाने घेतला आहे.

त्यानुसार एमएमआरमध्ये नवीन १० मार्गांवर जलवाहतूक सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, यासाठी सविस्तर आराखड्याचे काम हाती घेण्यात आले आहे. हे काम सध्या अंतिम टप्प्यात असून, लवकरच सल्लागार कंपनीकडून हा आराखडा सागरी मंडळाला सादर केला जाणार आहे. त्यानंतर आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून एमएमआरमधील १० जलमार्गांवर जल मेट्रो सुरू करण्यात येणार आहे.

सध्या सागरी मंडळाकडून २१ जलमार्गांवर जलवाहतूक चालविली जात असून, एकूण ८५ किमी लांबीचे हे मार्ग आहेत. जलवाहतूक ही अतिजलद वाहतुकीचा एक प्रभावी पर्याय मानला जातो. एमएमआरला लाभलेल्या विस्तीर्ण समुद्रकिनाऱ्याचा विचार करता, वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी तसेच नागरिकांना जलद व पर्यायी वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आणखी १० नवीन जलमार्ग विकसित करण्याचा निर्णय सागरी मंडळाने घेतला आहे.

त्यानुसार या नवीन १० जलमार्गांचा सविस्तर आराखडा तयार करण्यासाठी मेसर्स कोची मेट्रो लिमिटेड या कंपनीची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान, या जलमार्गांचा आधी व्यवहार्यता तपासणी अहवालही पूर्ण करण्यात आला आहे. त्यानंतर सविस्तर आराखड्याचे काम हाती घेण्यात आले होते.

आता सविस्तर आराखड्याचे काम अंतिम टप्प्यात असल्याची लेखी माहिती सागरी मंडळाने खासदार रवींद्र वायकर यांना कळवली. आराखडा पूर्ण करून येत्या काही दिवसातच तो सागरी मंडळाला सादर केला जाणार आहे. हा आराखडा सादर झाल्यानंतर हे १० जलमार्ग नेमके कसे असणार, त्यावर कोणत्या प्रकारच्या जल मेट्रो धावणार, त्यासाठी किती खर्च येणार यासह अनेक बाबी स्पष्ट होतील.



# सौंदर्याची खाण, बॉलिवूडची शान मधुबाला



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

आज १४ फेब्रुवारी, बॉलिवूडची मर्लिन मनरो, सौंदर्याची खाण, बॉलिवूडची शान, चित्रपट सृष्टीतीलच नव्हे तर भारतातील सर्वात सुंदर महिला असे जीचे वर्णन केले जाते त्या मधुबाला यांचा आज जन्मदिन. आज त्यांची ९३ वि जयंती. १४ फेब्रुवारी १९३३ रोजी दिल्लीच्या एका पश्तून कुटुंबात जन्मलेल्या मधुबाला यांचे मूळ नाव मुमताज बेगम जहाँ देहलवी. असे म्हणतात की मधुबाला यांच्या जन्मानंतर एका व्यक्तीने तिच्या बाबत असे भविष्य वर्तवले होते की ती तिच्या आयुष्यात खूप ख्याती मिळवेल. पैसा अडका, धन संपत्ती मिळवेल पण तिचे आयुष्य अतिशय दुःखी असेल. या भविष्यावर विश्वास ठेवून तिचे वडील तिला मुंबईला घेऊन आले. वयाच्या नवव्या वर्षी म्हणजे १९४२ साली मधुबाला यांनी बेबी मुमताज या नावाने चित्रपटात भूमिका करण्यास सुरुवात केली. बाबुराव पटेल आणि डॉ सुशीलाराणी पटेल या दाम्पत्याचा मधुबाला वर विशेष लोभ होता त्यांनीच तिला मधुबाला हे नाव दिले. बालवयातच चित्रपटात काम करू लागल्याने मधुबाला या शाळेत जाऊ शकल्या नाहीत त्यामुळे त्यांना इंग्रजी येत नसे मात्र उर्दू भाषा येत होती. चित्रपटात भूमिका करण्यास सुरवात केल्यावर मात्र तिने इंग्रजीवर चांगले प्रभुत्व मिळवले. तिचे वडील कडक शिस्तीचे असल्याने ती कधीही चित्रपटाच्या प्रीमियरला उपस्थित राहत नसे. १९४७ साली आलेल्या निलकमल या चित्रपटात ती पहिल्यांदा अभिनेत्री म्हणून झळकली. याच वर्षी तिचा आणखी एक चित्रपट रिलीज झाला. पुढच्या वर्षी म्हणजे १९४८ साली तिचा अमर प्रेम नावाचा चित्रपट आला या सर्व चित्रपटात राज कपूर हे तिचे नायक होते. यानंतर बॉम्बे टॉकीजचा महल नावाचा चित्रपट आला हा चित्रपट सुपर डुपर हिट ठरला. यानंतर मात्र मधुबाला यांनी मागे वळून पाहिले नाही. अशोक कुमार, दिलीपकुमार, देवानंद या त्या काळातील आघाडीच्या अभिनेत्यांसह तिने भूमिका केल्या. अल्पावधीतच त्या बॉलिवूडच्या आघाडीच्या अभिनेत्री बनल्या. त्यांनी आपल्या करियरमध्ये ६६ चित्रपटात भूमिका केल्या. बॉलिवूडचे पहिले सुपरस्टार दिलीपकुमार यांच्यावर त्या एकतर्फी प्रेम करत असत. मुघले आझम चित्रपटाच्या शूटिंगच्या दरम्यान त्यांनी दिलीपकुमार यांच्याशी लग्न करण्याची इच्छा बोलून दाखवली मात्र दिलीपकुमार यांनी लग्नास स्पष्ट नकार दिला. त्यानंतर त्यांनी गायक किशोरकुमार यांच्याशी विवाह केला. मधुबाला या किशोरकुमार यांच्या चौथ्या पत्नी होत्या. किशोरकुमार यांच्या बरोबरचे लग्न ही बाब दोघांसाठी कसेतरी जगण्यासाठी केलेली तडजोड होती त्यामुळेच दोघांचे जास्त पटत नसे. मधुबाला यांना हृदय रोग होता आणि १९५० पासून त्यांच्यावर उपचार चालू होते. पण तिने ही गोष्ट सर्वांपासून लपवून ठेवली होती. तिची तब्येत बरी नसतानाही त्यांनी निर्माते दिग्दर्शकांचे नुकसान होऊ नये म्हणून साइन केलेले चित्रपट पूर्ण केले. या चित्रपटात असे कोठेही जाणवत नव्हते की त्या आजारी आहेत. हृदय रोगासोबत त्यांना असा एक आजार होता की ज्या आजाराने शरीरात प्रमाणापेक्षा अधिक रक्त तयार होत असे व तिच्या नाकातून व तोंडातून रक्तस्त्राव होत असे. इतक्या दुर्धर आजारातही तिने चित्रपटात काम करणे सुरूच ठेवले. मुघले आझम या चित्रपटातील एका दृश्यात तिला दोरखंडाने बांधले होते पण तिने तब्येत बरी नसतानाही ते सहन केले. ती म्हणायची अनारकलीची भूमिका करण्याची संधी पुन्हा मिळणार नाही. ती इतकी प्रोफेशनल होती की आपले काम अतिशय तन्मयतेने करत असत. प्रसंगी जेवण झाले नाही तरी चालेल, थर्ड क्लासने प्रवास करावा लागला तरी चालेल पण काम वेळेच्या वेळी पूर्ण करण्याचा तिचा आग्रह असे. तिच्या याच कामाच्या निष्ठेमुळे ती महान अभिनेत्री बनली. अमेरिकेच्या थिएटर आर्टस या जगप्रसिद्ध मासिकेने तिचा जगातील सर्वात मोठी अभिनेत्री म्हणून गौरव केला होता. तिच्या सौंदर्याची जादूच अशी होती की बघणारा हरखून जायचा. पण हेच आरस्पानी सौंदर्य तिच्यासाठी मात्र शापित ठरले. वयाच्या अवघ्या ३६ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. २३ फेब्रुवारी १९६९ साली त्यांनी जगाचा निरोप घेतला. मधुबालाला व्हीनस ऑफ स्क्रीन असे म्हटले जाते मात्र तिच्या याच आरस्पानी सौंदर्याला अल्पायुष्याचा शाप होता. आज त्या जाऊन ५७ वर्ष झाले मात्र तिच्या सौंदर्याची आणि अभिनयाची जादू आजही कायम आहे. सौंदर्याची खाण बॉलिवूडची शान असलेल्या मधुबाला यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# बनावट शालार्थ आयडीद्वारे सव्वाकोटीच्या अनुदानावर डल्ला

## शिक्षण मंडळाच्या माजी अध्यक्षांसह २० जणांविरोधात गुन्हा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : बनावट कागदपत्रांच्या आधारे शालार्थ ओळख क्रमांक तयार करून १ कोटी २४ लाख ६९ हजार १२१ रुपयांचे अनुदान हडप केल्याप्रकरणी वाशी पोलिसांनी २० जणांविरोधात गुन्हा दाखल केला. या आरोपींमध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे मुंबई विभागाचे माजी अध्यक्ष नितीन उपासनी यांचाही समावेश आहे.

बनावट शालार्थ ओळख क्रमांक (आयडी) तयार करून अनेक संस्थांनी आणिअधिकाऱ्यांनी राज्यात मोठा गैरव्यवहार केला आहे. त्यामुळे शासनाने या शालार्थ आयडींची कसून चौकशी सुरू केली आहे. या चौकशीमध्ये अलिबाग येथील जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे मानद चिटणीस मिलिंद पाटील, तत्कालीन प्राचार्य अनिल पाटील, विद्यमान प्राचार्य सोनाली पाटील, सहशिक्षिका मयूरी पाटील, जयेश पाटील, स्वप्नाली राऊत, वैभव गोसावी, खोपोली तालुका शिक्षण प्रसारक मंडळ केएमसी संस्थेचे कार्यवाह किशोर पाटील, कनिष्ठ महाविद्यालय तत्कालीन प्राचार्य एन. बी. पवार, एन. रामास्वामी, डी. पी. हरिदास, एन. खानविलकर, पी. जी. पाटील, विद्यमान प्राचार्य डीपी गायकवाड, सहशिक्षिका प्राची नलावडे, संचालक दिनेश गुरव, शेखर कुलकर्णी, गायत्री कुलकर्णी तसेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक तत्कालीन विभागीय अध्यक्ष नितीन उपासनी यांच्यासह अजून काही जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील शेखर कुलकर्णी यांची पत्नी गायत्री कुलकर्णी यांनी याकामी मदत केल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकारात कोट्यवधी रुपयांचा अपहार करण्यात आला आहे. हा सर्व प्रकार शालेय संस्था आणि विभागीय शिक्षण मंडळ यांच्या संगनमताने झाल्याचे तक्रारीत म्हटले आहे. त्यामुळे वाशी विभागीय मंडळाचे राजेंद्र अहिरे यांनी केलेल्या तक्रारीनुसार वाशी पोलिसांनी सुमारे २० आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला, या प्रकरणी संबंधित शिक्षण संस्था प्रतिनिधींची प्रतिक्रिया मिळू शकली नाही.

# वाहुली येथील पांडवगड शिवरात्री महोत्सवासाठी सज्ज

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**पडघा** : भिवंडी तालुक्यातील मुंबई नाशिक महामार्गालगत असलेल्या वाहुली येथील डोंगरावर असलेला पुरातन पांडवगड शिवरात्री महोत्सवासाठी सज्ज झाला आहे.

वाहुली गावाजवळ असलेल्या पुरातन पांडवगडावर परीसरातील मंहत, साधु, संत, यांच्या आशीर्वादाने सकल हिन्दु समाजाच्या वतीने शिवरात्री महोत्सव मोठ्या भक्तीभावाने साजरा केला जातो याहीवर्षी शिवरात्रीचे औचित्य साधून रवीवारी शिवरात्री महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. पांडव गडावर पाच पांडव काही वेळ या डोंगरावर वास्तव्यास होते त्यावेळी त्यांनी डोंगराच्या पठार भागावर जमीनीच्या भूभागात पाण्याची कुंड तयार केली. असल्याची दंतकथा सांगितली जाते. ही कुंडे आजही सुस्थितीत आस्तित्वात असुन वर्षभर थंडगार शुध्द पाण्याने भरलेली असतात. त्यामुळे ही पाण्याची कुंडे येथे येणाऱ्या शिवभक्त व नागरीकांच्या आकर्षणाचा विषय असतो. तसेच अनेक वर्षापासून ही कुंडे डोंगरावर चरायला आलेल्या जनावरांसाठी व लाकूडफाटा गोळा करण्यासाठी गेलेल्या नागरीकांसाठी, वाटसरूंसाठी घनदाट जंगलात पिण्याचे पाणी एक वरदान असल्याचे व मागील वर्षी ही पाण्याची कुंडे साफ करताना त्यात शिवलिंग सापडल्याचे नागरीकांनी सांगितले. त्यामुळे पांडवगडाची ख्याती दुरवर पसरली असुनु परिसरातील शेकडो शिवभक्त पांडवगडावर दर्शनासाठी येतील असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

# वर्टेक्स स्कूल संस्काराचे केंद्र - डॉ. रतिलाल बाबेल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण** : विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबरोबर, मन मेंदू व मनगट बळकट करणारे वर्टेक्स स्कूल हे संस्काराचे केंद्र असल्याचे मत डॉ. रतिलाल बाबेल यांनी व्यक्त केले. प्रियदर्शनी समाज विकास सहाय्य संस्था, मोहोने (कल्याण) संचलित वर्टेक्स स्कूल, मोहोने च्या स्नेहसंमेलन व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. रतिलाल बाबेल बोलत होते. या प्रसंगी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या महापौर हर्षाली चौधरी, नगरसेवक रोहन कोट, पोलीस पाटील वासुदेव पाटील, सामाजिक युवा कार्यकर्ते वैभव भोईर, विजय पारख, प्रमोद घरत, अक्षदा बाबेल, सामाजिक कार्यकर्त्या रेखा हिरा, शिवसेना उपशहर प्रमुख रमण तरे, प्रियदर्शनी समाज सहाय्य विकास संस्थेचे अध्यक्ष व माजी नगरसेवक जे. सी कटारिया, माजी नगरसेविका व वर्टेक्स स्कूलच्या संचालिका माया कटारिया, स्कूल कमिटी अध्यक्ष मनीष कटारिया, सेक्रेटरी दीनानाथ पाटील, प्रिन्सिपल स्नेहा कटारिया, सर्व शिक्षक स्टाफ, वर्टेक्स स्कूलचे सर्व विद्यार्थी व त्यांचे पालक यासंह राजकीय, सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

या प्रसंगी उपस्थित महापौर हर्षाली चौधरी-थविल यांनी सांगितले की वर्टेक्स स्कुल मध्ये शिक्षणाबरोबर संस्कार केले जातात. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था सामाजिक बांधिलकीने काम करीत आहे. वैभव भोईर मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम पाहून मन भारावून गेले, अंगावर रोमांच उभे राहिले. उपस्थित सर्वांना आपल्या बालपणाची आठवण झाली. कार्यक्रमा मधील विषय हे प्रबोधन करणारे होते.

स्कूलच्या संस्थापिका माया कटारिया म्हणाल्या की, पुस्तकी शिक्षणाबरोबर आधुनिक जगतात उपयोगी पडणारे शिक्षण व मूल्य शिक्षण देण्याचे काम आमची संस्था करते. वर्षभरात शाळेमध्ये झालेल्या विविध स्पर्धा, क्रीडा स्पर्धा यातील सहभाग व प्रविण्य मिळालेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके व प्रशस्तीपत्रके मान्यवरांच्या उपस्थितीत देण्यात आले. सर्वांचा यथायोग्य सन्मान संस्थेचे अध्यक्ष जे. सी. कटारिया, संचालिका माया कटारिया, मनीष कटारिया, स्नेहा कटारिया यांनी केला. हा कार्यक्रम माया कटारिया यांचे मार्गदर्शन व स्कुल कमिटी अध्यक्ष मनिष कटारिया, सेक्रेटरी दीनानाथ पाटील, प्रन्सिपल स्नेहा कटारिया व सर्व शिक्षक यांनी सुनियोजन व मेहनत घेऊन आयोजित केला होता. यात शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

विविध कार्यक्रमांमधून सहभागी विद्यार्थ्यांनी मोबाईलचा कमीत कमीत वापर करणे, अपयशाने घाबरुन न जाणे, मी हे करू शकतो असा आत्मविश्वास बाळगणे, ठरविली तर कोणतीही गोष्ट अथक परिश्रमाने अशक्य नाही, माहिती तंत्रज्ञानाची कास धरणे असा संदेश देताना डोळयाची पारणे फिटतील असे सादरीकरण झाले. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावरील कार्यक्रमाने सर्व मान्यवर भारावून गेले. जीवनातील खेळाचे महत्व, ऑपरेशन सिंदूर या कार्यक्रमाने उपस्थित सर्वजण भावूक झाले. दोन सत्रात एकूण 20 कार्यक्रम सादर करण्यात आले.

# हर्षाली गायकवाड समिती सभापतिपदी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**बदलापूर** : बदलापूर नगरपालिकेच्या मागासवर्गीय समिती सभापतिपदी राष्ट्रवादी (अजित पवार) च्या हर्षाली गायकवाड यांची बिनविरोध निवड झाली. पाच सदस्यांच्या समितीत शिंदेसेनेच्या दोन सदस्यांची निवड करण्यात आली. मागासवर्गीय समिती गठित करण्यासाठी नगराध्यक्षा रुचिता घोरपडे यांच्या मार्गदर्शनात विशेष बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीत सभापती म्हणून गायकवाड यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले. तर, सदस्य म्हणून मोहन चतुरे, ॲड. भाविता घोरपडे तर शिंदेसेनेकडून संदेश ढमढेरे आणि रेश्मा राठोड यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

# 'ॲडव्हांटेज विदर्भ' आंतरराष्ट्रीय व्यावसाय परिषदेत डॉ.सुनील खर्डीकर सन्मानित

दै.ठाणे जीवनदीप वार्ता




**कल्याण** : विदर्भाला जागतिक गुंतवणुकीचा 'हब' बनवण्याच्या उद्देशाने आयोजित 'ॲडव्हांटेज विदर्भ २०२६' या आंतरराष्ट्रीय व्यवसाय परिषद नागपूर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या सोहळ्यात उद्योग जगताने विदर्भावर विश्वास दाखवत लाखो कोटींच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार केले आहेत. आयोजित परिषदेला डोंबिवलीतील खर्डीकर क्लासेसचे संचालक अध्यक्ष तसेच प्रसिद्ध व्यवसायिक डॉ.सुनील खर्डीकर हे देखील उपस्थित राहिले होते. व्यावसायिक क्षेत्रातील यशस्वी कारकिर्दीबाबत त्यांना चीन देशाचे प्रतिनिधी कीन जाय यांच्याहस्ते सन्मानित करण्यात आले.

आयोजित परिषदेत प्रामुख्याने अदानी समूहाने ७०,००० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीची घोषणा करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यासोबतच, महिंद्रा अँड महिंद्रा समूहाने १५,००० कोटी रुपयांचा प्रकल्प नागपुरात उभारण्याचे निश्चित केले आहे. या गुंतवणुकीमुळे विदर्भातील ऑटोमोबाईल, सौर ऊर्जा आणि लॉजिस्टिक क्षेत्राला मोठी उभारी मिळणार आहे. "विदर्भ आता केवळ कृषीप्रधान प्रदेश राहिला नसून तो उद्योगांचे पॉवरहाऊस बनत आहे. या परिषदेतून होणाऱ्या गुंतवणुकीमुळे पुढील ५ वर्षांत सुमारे ५ लाख प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होतील, ज्यामुळे स्थानिक तरुणांचे स्थलांतर थांबेल." अशा भावना यावेळी डॉ.सुनील खर्डीकर यांनी व्यक्त केल्या.

या तीन दिवसीय परिषदेत रशिया, चीन, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकन देशांसह एकूण २३ देशांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. ३५० हून अधिक स्टॉल्सच्या माध्यमातून विदर्भातील स्टार्टअप्स आणि मध्यम उद्योजकांना आपली उत्पादने जागतिक व्यासपीठावर मांडण्याची संधी मिळाली आहे. डॉ.सुनील खर्डीकर यांनीही इतर व्यावसायिकांच्या भेटीगाठी घेत विचारांचे आदान प्रदान केले. नागपुरात झालेल्या या आंतरराष्ट्रीय व्यावसायिक परिषदेत विविध देशांतील प्रतिनिधीं समवेत हितगुज करता आले. व्यवसायातील बारकावे, करावयाच्या गोष्टी याबाबत इतर व्यवसायिकां समवेत चर्चा करता आली. भारतातील उद्योग व परदेशातील उद्योग यातील तफावतीची प्रकर्षाने जाणीव झाली. आज भारतात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत असेल तर भविष्यात नक्कीच रोजगाराच्या असंख्य संधी उपलब्ध होतील असा विश्वास डॉ.सुनील खर्डीकर यांनी व्यक्त केला.

# काल्हेर खाडीपात्रावरील अवैध रेती साठ्यांवर कारवाई

## पोकलेन , डंपर सह सत्यानव लाखांचा मूद्देमाल जप्त, महसूल विभागाने दिला रेती माफियांना मोठा दणका

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : उल्हास नदीच्या खाडीपात्रात मोठ्या प्रमाणावर बेकायदा रेती उपसा केला जात असल्याच्या तक्रारीनंतर ठाण्याचे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी रेती माफियांच्या विरोधात कठोर कारवाईचे निर्देश दिले, त्यानूसार अपर जिल्हाधिकारी हरीचंद्र पाटील, उपजिल्हाधिकारी रूपाली भालके उपविभागीय अधिकारी अमित सानप यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा खनिकर्म अधिकारी विवेक घुले,रेतीगट तहसीलदार अमोल कदम भिवंडी तहसीलदार अभिजित खोले,यांच्या नेतृत्वाखाली दक्षता पथक क्रमांक एक संजय जाधव, सहाय्यक महसूल अधिकारी दिनेश बोराडे अनिल राजापूरे, दक्षता पथक क्रमांक दोन अरूण शेलार, सहायक महसूल अधिकारी दर्शन नटे , जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे, तसेच मंडळ अधिकारी सुधाकर कामडी, ग्राम महसूल अधिकारी निलेश कार्बेरे सुर्यकांत पाटील, यांच्या समवेत गूरूवारी भिवंडी तालुक्यातील मौजे काल्हेर येथील रेती बंदर येथे कारवाई केली, यावेळी १९ रेती साठे आढळून आले,१५२३, ब्रास रेती,रेती उपसा करणाऱ्यांसाठी वापरण्यात येणाऱ्या एक वाहन हायवा,व पोकलेन जप्त करण्यात आली,तर सहा रेतीने भरलेल्या कुंड्या आढळून आल्या त्या पोकलेनच्या सहाय्याने नष्ट करण्यात आल्या पथकाने ९७ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे, या कारवाईमूळे माफीयांचे धाबे दणाणले आहेत, काल्हेर बंदर येथिल बेकायदा उत्खनन करून रेती साठवणूक करण्यासाठी तयार करण्यासाठी तयार केलेल्या सहा कुंड्या पोकलेनच्या सहाय्याने नष्ट करण्यात आल्या, महसूल विभागाची ही चौथी धडक कारवाई आहे, या प्रकरणी रेती माफिया विरोधात नारपोली पोलिसठाण्यात गून्हा दाखल करण्यात आला आहे,

# रक्तदानातील उत्कृष्ट कार्यासाठी मुंबई विद्यापीठातर्फे एसएसटी महाविद्यालयाचा गौरव

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : सामाजिक बांधिलकी जपत सातत्याने समाजोपयोगी उपक्रम राबवणाऱ्या एस.एस. टी. कला आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या एनएसएस युनिटचा मुंबई विद्यापीठातर्फे प्रशस्तीपत्र व स्मृतीचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. रक्तदान शिबिरांच्या यशस्वी आयोजनाबरोबरच जनजागृतीत दिलेल्या उल्लेखनीय योगदानाची ही दखल आहे.

मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी भवन येथे पार पडलेल्या दिमाखदार सोहळयात विद्यापीठाच्या एनएसएस सेलचे ओएसडी प्रा.सुशील शिंदे, कार्यक्रम अधिकारी रमेश देवकर तसेच अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत महाविद्यालयाचा सन्मान करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा एनएसएसचे ठाणे जिल्हा समन्वयक प्रा.जीवन विचारे आणि एनएसएस स्वयंसेवक उपस्थित होते. एस.एस.टी. महाविद्यालयाने रक्तदान शिबिरांसाठी व्यापक जनजागृती करत विद्यार्थ्यांमध्ये व नागरिकांमध्ये रक्तदानाचे महत्त्व रुजवले. विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून रक्तदानाबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करून प्रत्यक्ष शिबिरांचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल हा सन्मान प्रदान करण्यात आला.

महाविद्यालयाच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. संस्थापक प्राचार्य डॉ. पुरस्वानी यांनी सांगितले की, एस.एस.टी. महाविद्यालय सामाजिक जबाबदारी जपत रक्तदानाबरोबरच ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग बालके, समाजातील उपेक्षित घटक आणि पर्यावरण संवर्धन या क्षेत्रातही सातत्याने कार्यरत आहे. भविष्यातही विविध समाजोपयोगी उपक्रम राबवत समाजासाठी कटिबद्ध राहण्याचा महाविद्यालयाचा निर्धार आहे.

# भविष्यवेध



शनिवार
१४ फेब्रुवारी २०२६

**मेष**
ताजेतवाने वाटू शकते. यश हातातोंडाशी येण्याची शक्यता वाटताना आपली ताकद कमी होत जाण्याची भावना निर्माण होईल. निराशाजनक आर्थिक परिस्थितीमुळे काही महत्त्वाच्या कामामध्ये खंड पडू शकतो.

**वृषभ**
दिवस उत्तम जाईल. आपल्या मित्रांना रात्रीचे जेवण आणि नृत्यासाठी बाहेर घेऊन जाण्यापूर्वी विचार करा. कार्यात यश मिळविण्यासाठी आपले मत ठामपणे मांडा. मित्रांच्या सहाय्याने अनुकूलता वाढेल.

**मिथुन**
व्यापार व प्रणयाच्या क्षेत्रात यश मिळेल. प्रिय व्यक्तीबरोबर संवाद होईल. आवश्यक कार्य देखील पूर्ण होतील. मित्रांचा अनुकूल सहयोग मिळेल. आपल्या आपल्या नातलगांची व मित्रांची चांगली भेट होईल.

**कर्क**
जे लोक बऱ्याच दिवसापासून खूप व्यस्त होते त्यांना आज स्वतःसाठी वेळ मिळू शकतो. वादविवाद किंवा कार्यालयातील राजकारण, तुम्ही या सगळ्याला पुरून उराल. हसत खेळत वेळ खर्च होईल.

**सिंह**
लाभ प्राप्तिचा योग. व्यापारातील आर्थिक त्रासाला संयमाने सोडवच्याचा प्रयत्न करा. निवेश प्रत्याशित.आपल्या कार्याच्या दरम्यान आपल्या कौटुंबिक ताणांचे स्मरण करून त्यांना कार्यात मिसळू नये.

**कन्या**
घरगुती कामं बराच काळ व्यस्त ठेवतील. धार्मिक आणि अध्यात्मिक हेतू पूर्ण करण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. अनियोजित माध्यमातून मिळणारे पैसे तुमचा दिवस उजळून टाकतील.

**तुळ**
जीवनात ध्येयावर लक्ष द्या पूर्ण विश्वासाने त्याच्या प्राप्तीचा प्रयत्न करा.व्यापारात कार्यक्षेत्राचा विकास, व्यापारिक बाधा येऊ शकतात. आय पेक्षा व्यय अधिक असल्याने आर्थिक तंगीची आशंका.

**वृश्चिक**
आपल्या व्यावसायिक योजनेबद्दल होकारात्मक दृष्टीकोण प्रदर्शित करा. आजचा दिवस व्यापार क्षेत्रातील चांगली बातमी आणणारा आहे. जुनी कामे झाल्यामुळे उत्साह आणि प्रसन्नता वाटेल.

**धनु**
व्यापार-व्यवसाय सहज राहील. कौटुंबिक सभासदांचा सहयोग मिळेल. यात्रा घडू शकते. अडकलेला पैसा मिळाल्याने आनंद वाटेल. कौटुंबिक चिंता दूर होईल. व्यावसायिक स्थिति चांगली राहील.

**मकर**
बळात वाढ होईल. आरोग्य उत्तम राहील. महत्त्वाच्या कामांसाठी श्रम करावे लागेल. आर्थिक विषयांमध्ये सावगिरी बाळगा. सुख-शांतीचे वातावरण राहील. हसत खेळत वेळ खर्च होईल.

**कुंभ**
आपल्या कार्याच्या दरम्यान आपल्या कौटुंबिक ताणांचे स्मरण करून त्यांना कार्यात मिसळू नये. आपल्या ्यावसायिक योजनेबद्दल होकारात्मक दृष्टीकोण प्रदर्शित करा. महत्वपूर्ण कार्यांवर व्यय होईल.

**मीन**
तटस्थ भूमिका घेणे, प्रगतिवर्धक बातम्या मिळतील. मुलांची उन्नति प्रसन्नता देईल. आधी केलेल्या कामाचे फळ मिळेल. बिघडलेले संबंध सुधारतील.नवीन जोखिम असलेली कार्ये टाळा.

# मुंबई क्लायमेट वीक अंतर्गत '47°C' लघुचित्रपट प्रदर्शन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : मुंबई क्लायमेट वीकचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिका, प्रोजेक्ट मुंबई आणि एसआयईएस इन्स्टिट्यूट, नेरुळ यांच्या संयुक्त विद्यमाने '47°C' या लघुचित्रपटाचे प्रदर्शन व त्यानंतर उपाययोजनांवरील संवाद कार्यक्रम संपन्न झाला.



लघुचित्रपटानंतर 'हवामान बदल आणि त्याचा सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होणारा परिणाम' या महत्त्वपूर्ण विषयावर आधारित चर्चासत्र पार पडले. यामध्ये लेखक व चित्रपट दिग्दर्शक श्री. तेज सिसोदिया, सिविक स्टुडिओचे श्री.श्रेय जैन आणि नवी मुंबई महानगरपालिकेचे मुख्य स्वच्छता अधिकारी श्री. राजेंद्र इंगळे यांनी वैचारिक सहभाग घेतला. यावेळी वाढत्या तापमानाची तीव्रता, शहरी भागातील उष्णतेची समस्या, कचरा व्यवस्थापन, हरित उपक्रम आणि नागरिकांच्या सहभागाची गरज यावर चर्चा करण्यात आली. हवामान बदलाचा सामना करण्यासाठी शाश्वत जीवनशैली, पर्यावरणपूरक सवयी आणि स्थानिक पातळीवर राबवता येणाऱ्या उपाययोजनांवर विशेष भर देण्याविषयी भाष्य करण्यात आले.या कार्यक्रमाला एसआयईएस महाविद्यालय नेरूळ, डी वाय पाटील महाविद्यालय नेरूळ, स्टर्लिंग कॉलेज नेरूळ, बंट्स महाविद्यालय येथील 150 हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून आपली मते मांडली आणि पर्यावरण संवर्धनासाठी सक्रिय भूमिका घेण्याचा निर्धार व्यक्त केला. मुंबई क्लायमेट वीक अंतर्गत आयोजित '47°C' या लघुचित्रपटाचे प्रदर्शन व त्यानंतर उपाययोजनांवरील संवाद हा उपक्रम युवा पिढीमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरला.

# सफाई कामगारांच्या वारसांना नियुक्ती आदेशांचे वाटप

**सेवानिवृत्त/मयत सफाई कामगारांच्या वारसांना महापौर हर्षाली चौधरी, उप महापौर राहुल दामले व आयुक्त अभिनव गोयल यांचे हस्ते लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने नियुक्ती आदेशांचे वाटप!**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सेवानिवृत्त तसेच मयत सफाई कामगारांच्या 51 वारसांना लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने नियुक्ती पत्र (आदेश) वाटप आज महापौर हर्षाली चौधरी, उप महापौर राहुल दामले व आयुक्त अभिनव गोयल यांचे हस्ते महापौर दालनात करण्यात आले. यावेळी सामान्य प्रशासन विभागाच्या उपआयुक्त वंदना गुळवे, महापालिका सचिव किशोर शेळके, सामान्य प्रशासन विभागाच्या सहा.आयुक्त सुषमा मांडगे, भाजपा गटनेते शशिकांत कांबळे तसेच पालिका सदस्य वरुण पाटील, गणेश जाधव व इतर मान्यवर उपस्थित होते. लाभार्थ्यांना नियुक्ती पत्र देताना महापौर हर्षाली चौधरी यांनी उपस्थित लाभार्थ्यांना शुभेच्छा दिल्या आणि अधिक कार्यक्षमतेने आपले काम करणेबाबत सुचना दिल्या. नव्याने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांनी शहराच्या विकासासाठी प्रामाणिकपणे व कार्यक्षमतेने काम करून महानगरपालिकेची सेवा अधिक चांगल्या रितीने करावी, असे मार्गदर्शन महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी यावेळी उपस्थित लाभार्थ्यांना केले. महापालिकेने गेल्या वर्षभरात एकुण 232 वारसांना नियुक्ती पत्रे दिली असून, आतापर्यंत वारसाहक्कासाठी अर्ज केलेल्या लाभार्थ्यांसाठी दोन वेळा मार्गदर्शनपर शिबीराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती, सामान्य प्रशासन विभागाच्या उपआयुक्त वंदना गुळवे यांनी यासमयी दिली.


## कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती, कल्याण

मा. शरदचंद्रजी पवार मुख्य बाजार आवार, एन टाईप इमारत, १ ला मजला,
कल्याण- शिळ रोड, कल्याण (प), जि. ठाणे ४२१ ३०१
दुरध्वनी क्रमांक (०२५१) २९७०३१६ ,e mail :- apmckalyan@rediffmail.com

### फेर निविदा सुचना सन २०२५- २०२६

कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती, कल्याण जि. ठाणे समितीचे मुख्य बाजार आवारात समितीने निश्चित केलेल्या दरानुसार वाहन प्रवेश फी वसुली व पे अन्ड पार्क धर्तीवर १ वर्ष कालावधी करीता चालविण्यास देणेकामी इच्छुक व्यक्ती/संस्था यांच्याकडून जाहिर निविदा मागविण्यांत येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | निविदा अनामत रक्कम | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|
| १) | कल्याण कृषि उत्पन्न बाजार समितीचे मुख्य बाजार आवारामध्ये वाहन प्रवेश फी गोळा करणे व पे अन्ड पार्क १ वर्ष कालावधी करीता चालविणे बाबत. | र. रु.१०,००,०००/- | र. रु.११८०/- (जी.एस.टी. सह) |

१) निविदा विक्री दि. १६.०२.२०२६ ते दि. २३.०२.२०२६ वेळ दुपारी २.०० वाजेपर्यंत राहील.
२) निवीदा स्विकृती दि. १६.०२.२०२६ ते दि.२३.०२.२०२६ वेळ सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत राहील.
३) शक्य झाल्यास दि. २३.०२.२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता उपस्थित निविदाकारांचे समोर मुख्य कार्यालयात उघडण्यात येईल.

आलेल्या एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार बाजार समिती कल्याण यांनी राखुन ठेवलेला आहे.

**जा.क्र/कृउबास/फेर निविदा सुचना/३०४३/२०२६**
**दि १३/०२/२०२६**

**जा.क्र/कृउबास/जाहिरात प्रसिद्धिबबाबत /३०४४/२०२६**
**दि १३/०२/२०२६**

**सही/-**
**(रविंद्र नारायण घोडविंदे)**
**सभापती**
**कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती,**
**कल्याण जि.ठाणे.**


# अंबरनाथमध्ये शिंदेसेनेत गटबाजी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ** : निवडणूक संपताच अंबरनाथमध्ये शिंदेसेनेत पुन्हा गटबाजी सुरू झाल्याचे पाहायला मिळत आहे. दोन्ही गटांच्या बॅनर्सवरून एकमेकांचे फोटो गायब झाले आहेत. त्यामुळे दरवेळेप्रमाणे यंदाही त्यांचे मनोमिलन केवळ निवडणुकीपुरतेच असल्याची चर्चा आहे.शिंदेसेनेचे आ. डॉ. बालाजी किणीकर आणि शहरप्रमुख अरविंद वाळेकर यांचे शहरात स्वतंत्र गट आहेत. विधानसभा आणि नगरपालिका निवडणुकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या मध्यस्थीने दोन्ही गट एकत्र आले होते. थेट नगराध्यक्षपदाच्या उमेदवार मनीषा वाळेकर यांचा प्रचार, बैठकांमध्ये आ. डॉ. किणीकर सहभागी झाले होते. मात्र, निवडणुका होताच पुन्हा दोन्ही गटांनी बॅनर्सवरून एकमेकांचे फोटो गायब केले आहेत.

# मानसिक आरोग्यासाठी अध्यात्म व शाश्वत जीवनशैली आवश्यक : गौरांग दास

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे(13)** : आजच्या आधुनिक जीवनशैलीमुळे मानसिक तणाव मोठ्या प्रमाणात वाढला असून जगभरात मानसिक तणावामुळे दरवर्षी सुमारे एक ट्रिलियन डॉलरचे आर्थिक नुकसान होत आहे. धावपळीच्या आणि स्पर्धेच्या युगात वाढता मानसिक तणाव ही जागतिक समस्या बनली आहे. भारतातही आत्महत्यांच्या घटनांमध्ये चिंताजनक वाढ होत असून मानसिक आरोग्य हा अत्यंत गंभीर विषय बनला आहे. शारीरिक आरोग्याइतकेच मानसिक आरोग्य जपण्यासाठी अध्यात्म आणि शाश्वत जीवनशैलीचा अवलंब करणे काळाची गरज असल्याचे मार्गदर्शन इस्कॉनचे आध्यात्मिक नेते आणि गोवर्धन इकोव्हिलेजचे संचालक गौरांग दास यांनी 'तणावमुक्ती आणि आनंदी जीवनाची गुरूकिल्ली' या महत्वपूर्ण विषयावर केले.

ठाणे महानगरपालिका आणि इस्कॉन ठाणे यांच्यावतीने ठाणे महानगरपालिकेतील अधिकारी कर्मचारी यांच्यासाठी विशेष व्याख्यानाचे आयोजन गुरूवारी (12 फेब्रुवारी) डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमास ठाणे महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित महापौर शर्मिला पिंपळोलकर, उपमहापौर कृष्णा पाटील, महापालिका आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त (2) प्रशांत रोडे, उपायुक्त जी.जी. गोदेपुरे, उमेश बिरारी, दिनेश तायडे, अनघा कदम, मिताली संचेती, दिपक झिंजाड यांच्यासह सर्व सहायक आयुक्त, महानगरपालिकेचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महापौर शर्मिला पिंपळोलकर,आयुक्त सौरभ राव यांच्या हस्ते गौरांग दास यांचा सन्मान करण्यात करण्यात आला.



आज प्रत्येक व्यक्ती हा तणावातून जात आहे, मग तो विद्यार्थी असो, गृहिणी असो की, नोकरदार वर्ग असो, प्रत्येकाला काही ना काही चिंता असते. यातून मार्ग काढणे गरजेचे असते. खरं आनंदी जीवन जगण्यासाठी संतुलन, समाधान आणि सकारात्मकतेची गरज भासत असल्याचे नमूद करीत महापालिकेने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाचे कौतुक महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी केले.

प्रत्येक क्षेत्रात काम करत असताना अडचणी येत असतात, त्यामुळे तणाव निर्माण होत असतो, दोष व्यवस्थेचा नसतो तर आपण कशा पध्दतीने प्रतिक्रिया देतो, येणाऱ्या आव्हानांना कसे सामोरे जातो हे महत्वाचे असते. धावपळीच्या जीवनात प्रत्येकाला तणावमुक्त जीवन जगता यावे, तणावमुक्ती का आवश्यक आहे.संतुलित जीवनाचे नेमके सूत्र कसे अवलंबावे यासाठी इस्कॉनने ठाणे महापालिकेच्या अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल आयुक्त सौरभ राव यांनी त्यांचे आभार व्यक्त केले.

यावेळी भगवद्गीतेतील शिकवणीचा संदर्भ देत तणावाचे मूळ कारण अपेक्षा आणि वास्तव यांतील अंतर आहे. "आपण सर्वजण सत्ता, पैसा, प्रतिष्ठा मिळविण्याचा प्रयत्न करतो; पण परिणाम आपल्या हातात नसतो. आपल्या हातात केवळ प्रयत्न असतात, परिणामावर नियंत्रण नसते, ही जाणीव तणावमुक्तीची पहिली पायरी आहे," असे गौरांग दास यांनी नमूद केले.

जीवनातील स्पर्धा, बढती, यश-अपयश यामुळे निर्माण होणारा ताण वाढतो, अपेक्षा पूर्ण न झाल्यास मनावर ताण वाढतो आणि त्याचे परिणाम मानसिक आरोग्यावर होतात, असे सांगून भगवद्गीतेच्या मार्गदर्शनाने सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्याचे आवाहन करण्यात आले. सन्मान, सेवा आणि सामूहिक शक्तीचा स्वीकार हे तणावमुक्त जीवनाचे महत्त्वाचे घटक असल्याचे सांगण्यात आले. "आपल्यापेक्षा मोठी शक्ती कार्यरत आहे, ही जाणीव ठेवून नम्रता आणि सेवा वृत्ती स्वीकारली तर मन शांत राहते," असे मार्गदर्शन करण्यात आले.

'चिंता सोडा आणि जगायला शिका' ('Stop Worrying and Start Living' ) हा मंत्र दिला. बाह्य परिस्थितीवर आपले नियंत्रण नसले तरी, आपल्या जाणीवा आणि विचारांवर आपण ताबा मिळवू शकतो असे गौरांग दास यांनी नमूद केले. ठाणे महानगरपालिकेने इस्कॉनच्या सहकार्याने अशा प्रकारच्या व्याख्यानाचे आयोजन केल्याबद्दल महापालिका अधिकाऱ्यांचे त्यांनी कौतुक केले.

# महापौर शर्मिला पिंपळोलकरांच्या अध्यक्षतेखाली पाणीपुरवठा आढावा बैठक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**ठाणे** : ठाणे महानगरपालिका हद्दीत काही भागांमध्ये भासत असलेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर महापौर शर्मिला रोहित पिंपळोलकर यांनी पदभार स्वीकारल्यानंतरची पहिलीच पाणीपुरवठा आढावा बैठक घेत नागरिकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाला थेट हात घातला.

महापौर दालनात आज पाणीपुरवठा विभागासोबत महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीस नगरअभियंता प्रशांत सोनग्रा, उपनगरअभियंता विकास ढोले, कार्यकारी अभियंता उपस्थित होते.

सध्या महापालिका हद्दीत जाणवणाऱ्या पाणीटंचाईचा सविस्तर आढावा घेत ज्या भागांत समस्या अधिक तीव्र आहे, तेथे अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून तातडीच्या उपाययोजना कराव्यात, असे निर्देश देण्यात आले. शहरात दररोज किती टँकरद्वारे मोफत पाणीपुरवठा केला जातो, त्याचे नियोजन, खर्च आणि पारदर्शकता याबाबतही सविस्तर माहिती सादर करण्यास सांगितले.

बैठकीत बृहन्मुंबई महानगरपालिकाकडे 50 एमएलडी वाढीव पाणीपुरवठ्याची केलेली मागणी आणि त्याऐवजी मिळालेल्या केवळ ५ एमएलडी पाण्याचा मुद्दा गांभीर्याने मांडण्यात आला. उर्वरित पाणी मिळवण्यासाठी कोणती प्रशासकीय पावले उचलावी लागतील, याबाबत तातडीने प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. यावेळी नगरअभियंता प्रशांत सोनग्रा यांनी या विषयासंदर्भात सोमवारी 16 फेब्रुवारी रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेत ठाणे महापालिकेच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक आयोजित करण्यात आली असल्याचे सांगितले.

महापालिका हद्दीतील आदिवासी पाड्यांमध्ये नियमित व मुबलक पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी., याचा स्वतंत्र अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. आवश्यक असल्यास अतिरिक्त टँकर वा पर्यायी स्रोतांचा वापर करण्याचे निर्देश देण्यात आले.

नवीन बांधकाम प्रकल्पांना पाणीपुरवठा होत असताना जुन्या गृहसंकुलामधून पाणीटंचाईच्या तक्रारी येत असल्याच्या पार्श्वभूमीवर महापौरांनी विचारणा केली. यावर घोडबंदर भागासाठी वाढीव पाणीपुरवठा उपलब्ध करुन टंचाई दूर करण्यात येईल असे अधिकाऱ्यांनी नमूद केले.

कळवा मुंब्रा व दिवा या भागात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत पाणी घेवून ठाणे महापालिकेमार्फत वितरीत करण्यात येते, या भागात मोठ्या प्रमाणात तक्रारी असून पाणी आठ ते दहा दिवसांनंतर उपलब्ध होत असल्याबाबत महापौर यांनी सांगितले, या भागासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे वाढीव पाण्याची मागणी केली असून या भागातील संप पंप हाऊस व जलकुंभ कार्यान्वित करुन पाणी पुरवठा सुरळीत करणेबाबत कार्यवाही करण्यात येत असल्याचे अधिकाऱ्यांनी बैठकीत नमूद केले.

ठाणे शहरासाठी आवश्यक त्या ठिकाणी नवीन कूपनलिका खोदणे व जुन्या कूपनलिकांची तातडीने दुरूस्ती करणेबाबत सूचना केल्या. याबाबतचा निविदा मंजूर असून तातडीने कार्यवाही करण्यात येईल असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

एप्रिल-मे महिन्यात पाणीटंचाई तीव्र होऊ नये यासाठी साठा व्यवस्थापन, गळती नियंत्रण, दुरुस्ती कामे, टँकर नियोजन आणि पर्यायी स्रोतांचा वापर याबाबत ठोस कृती आराखडा तयार करण्याच्या सूचना महापौरांनी दिल्या. तसेच शहरात अनधिकृत टँकर माफियाच्या जाळ्यावर कठोर कारवाई करण्याचेही निर्देश त्यांनी दिले.

# अंबरनाथ शिवमंदिरात महाशिवरात्रीची तयारी पूर्ण

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ :** महाशिवरात्रीनिमित्त अंबरनाथच्या प्राचीन शिवमंदिरात जय्यत तयारी सुरू आहे. मंदिर परिसरात मंडप घालण्यात आला असून दर्शन रांगांची व्यवस्था केली आहे. मंदिर परिसरात एकत्रितपणे गर्दी होणार नाही, याचीही दक्षता मंदिर व्यवस्थापनाकडून घेतली जात आहे.अंबरनाथचे प्राचीन शिवमंदिर तब्बल ९६६ वर्षे जुने आहे. दरवर्षी महाशिवरात्रीला येथे लाखो भाविक दर्शनासाठी येतात. ठाणे जिल्ह्यातील सर्वात मोठी जत्राही याच दिवशी अंबरनाथमध्ये भरते. यानिमित्ताने प्राचीन शिवमंदिरात भाविकांच्या सुविधेसाठी जय्यत तयारी केली आहे. शिव मंदिर परिसराची स्वच्छता करण्यात आली आहे. तेथे भाविकांना कोणताही त्रास होणार नाही, याची काळजी घेतली जात आहे. पोलिसांनी सुरक्षेच्या दृष्टिकोनातून चोख बंदोबस्त ठेवला आहे.






# महापौर शर्मिला पिंपळोलकरांच्या अध्यक्षतेखाली पाणीपुरवठा आढावा बैठक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी शहरास स्टेम प्राधिकरणाकडून ७३ द.ल.लि., बृहन्मुंबई महानगरपलिका ४२ द.ल.लि. व मनपाचे स्वतःच्या वऱ्हाळा तलावा मधून ५ द.ल.लि. असा एकुण १२० द.ल.लि. प्रतिदिन पाणी पुरवठा होत असून त्यापासून दररोज ९० द.ल.लि. प्रतिदिन सांडपाणी निर्माण होत आहे. सद्यस्थितीत ४३ द.ल.लि. क्षमतेची सांडपाण्यावर प्रक्रिया करणेकामी यंत्रणा कार्यान्वित असुन शहरात निर्माण होणाऱ्या ३० द.ल.लि. सांडपाण्यावर प्रक्रिया होत आहे.



भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात भुयारी गटार योजना टप्पा-२ प्रकल्पांतर्गत एकुण ७ पंपींग स्टेशन व ४ मलःशुद्धीकरण केंद्रे बांधण्यात आलेली आहेत. सदर पंपींग स्टेशन व मलःशुद्धीकरण केंद्रांचे TRIAL RUN सुरु आहे. सदर पंपींग स्टेशन व मलःशुद्धीकरण केंद्रे पुर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यानंतर शहरातून निर्माण होणाऱ्या सांडपाणी प्रक्रिया करणेची एकुण क्षमता ११२ द.ल.लि. प्रतिदिन होणार आहे. शहरातून निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर परिपुर्ण प्रक्रिया होणार आहे.

# आ. किसन कथोरे यांच्या हस्ते शाळांना संगणक वितरण

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मुरबाड तालुक्यातील आठ जिल्हा परिषद शाळांना संगणकांचे वाटप करण्यात आले. आयडीबीआय बँक लिमिटेडच्या कॉर्पोरेट सामाजिक दायित्व (CSR) निधीतून हा उपक्रम राबविण्यात आला असून, दि.12 फेब्रुवारी 2026 रोजी तहसीलदार कार्यालय, मुरबाड येथे आयोजित कार्यक्रमात आमदार किसन कथोरे यांच्या हस्ते संगणकांचे वितरण करण्यात आले.या उपक्रमांतर्गत मुरबाड तालुक्यातील खेडले तळवली, एकलहरे, मिल्हे, चासोळे, बळेगाव-उमरोली, कळंभाड, प्रधानपाडा आणि फांगळोशी येथील एकूण आठ जिल्हा परिषद शाळांना संगणक प्रदान करण्यात आले. या माध्यमातून ग्रामीण विद्यार्थ्यांना संगणक शिक्षणाची संधी उपलब्ध होऊन त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होण्यास मदत होणार आहे.यावेळी आमदार किसन कथोरे यांनी आयडीबीआय बँकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमानंतर आमदारांनी तहसीलदार कार्यालय, मुरबाड येथे भेट देऊन कार्यालयीन कामकाजाची पाहणी केली. कार्यालय परिसरातील स्वच्छतेबाबत समाधान व्यक्त करत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नागरिकांना सातत्याने लोकाभिमुख सेवा द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.तसेच तहसीलदार कार्यालयाच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. शासकीय इमारतींची दुरुस्ती व रंगरंगोटी तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता संजय कोरडे यांना देण्यात आल्या.

# कु.प्रतिक्षा बांगर नेट परीक्षा उत्तीर्ण

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**गोवेली :** जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई संचालित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली येथील एम.ए. भाग १ मराठी विभागातील विद्यार्थिनी कु. प्रतिक्षा योगेंद्र बांगर हिने राष्ट्रीय परीक्षा एजन्सी (NTA) द्वारा आयोजित राष्ट्रीय पात्रता परीक्षा (NET) यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली आहे.

हिने आपल्या जिद्द, परिश्रम व सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर हे यश संपादन केले असून तिच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष रविंद्र घोडविंदे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.



अशोक वाघ उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख हरेंद्र सोष्टे प्रा.सतीश लकडे प्राध्यापकवर्ग व शिक्षकेतर कर्मयोगी यांनी तिचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# अवैध शालेय वाहतूक करणाऱ्या १३ वाहनांवर कारवाई

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम) नियम, 2011, दि.22 मार्च 2011 मधील नियम 5 नुसार शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसंबंधीत स्कूलबस धोरणानुसार मुलांच्या सुरक्षिततेसंदर्भात दि.11 फेब्रुवारी 2026 रोजी अवैधरित्या शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या 13 वाहनांवरती मोटर वाहन कायदा 1988 व शालेय स्कूल बस नियमावली 2011 नुसार कारवाई करण्यात आली असून 1.36 लाख इतका दंड वसूल करण्यात आला आहे.या तपासणीमध्ये वाहनांच्या सर्व वैध कागदपत्रांस महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूलबसकरिता विनियम) नियम, 2011 मध्ये विहित केलेल्या सुरक्षिततेच्या मापदंडाप्रमाणे तपासणी करण्यात आली. मुख्यातः शालेय परवान, विद्यार्थी संख्या, चालकाचे वेध संवर्गातील अनुज्ञप्ती व बॅज, महिला सहवर्ती तपासणी करण्यात आली.ही तपासणी बदलापूर इत्यादी ठिकाणी कार्यरत असणाऱ्या शाळांच्या परिसरात करण्यात आली, असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कल्याण आशुतोष बारकुल यांनी कळविले आहे.

# सैनिक कल्याण विभागाच्या लिपिक टंकलेखक भरती परीक्षा शेड्युल जाहीर

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** सैनिक कल्याण विभाग व विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील लिपिक टंकलेखक (गट-क) एकूण 72 पदाकरीता टिसीएस-आयओएन यांच्या मार्फत दिनांक 14 मार्च 2026 रोजी दुपारी 01.00 ते 03.00 या वेळेत ऑनलाईन परीक्षा होणार आहे, असे सैनिक कल्याण विभाग महाराष्ट्र राज्य पुणे संचालक कर्नल दिपक ठोंगे (निवृत्त) यांनी कळविले आहे.

# महाशिवरात्रीसाठी पडघा कुंभेरेश्वर देवस्थान सज्ज

## देवस्थानात शिवभक्तांची गर्दी अपेक्षित

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पडघा :** भिवंडी तालुक्यातील पडघ्याजवळील कुंभेरी नदीकिनारी स्थित प्रसिद्ध कुंभेरेश्वर महादेव मंदीरात महाशिवरात्री उत्सव साजरा करण्यासाठी कुंभेरेश्वर देवस्थान संस्थान सज्ज झाले असुन उत्सवाची जय्यत तयारी सुरू आहे.

दरवर्षी कुंभेरेश्वर महादेव मंदीरात महाशिवरात्री उत्सव मोठ्या भक्तीभावाने साजरा केला जातो याहीवर्षी रवीवारी महाशिवरात्री निमीत्त शिवसेना नेते व कुंभेरेश्वर देवस्थान संस्थान अध्यक्ष प्रकाश पाटील मंहत शिवरुपांनंद स्वामी, उद्योजक पंडीत पाटील, सरपंच सायली पाटील, श्रीकांत गायकर, विष्णु चंदे,दिनेश गंधे,संजय बिडवी, गुरूनाथ जाधव, मयुर दुबेले,श्रीमती कमल पिचड, निलेश घोडविंदे, समीर घोडविंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उत्सव रवीवारी साजरा होणार असुन त्यात महारुद्राभिषेक, होम हवन,सकाळी१० ते १२ हभप महेंद्र महाराज, पहारे यांचे किर्तन, महाआरती दुपारी वज्रेश्वरी महीला



भजन मंडळ खडवली, गजानन प्रसादीक भजन मंडळ कल्याण, रुक्मिणी प्रसादीक भजन मंडळ कुंभारशिव यांचे भजन, तसेच प्रसिद्ध गायक जगदीश पाटील हे भक्तीगीत तर माऊली हरीपाठ मंडळ वडवली हे सामुदायिक हरिपाठ सादर करणार आहेत. तर ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय यांच्यां वतीने मार्गदर्शन व वैष्णव चॅरीटेबल ट्रस्ट, चिंतामणी हॉस्पिटल यांच्या वतीने आरोग्य शिबीर घेण्यात येणार आहेत तर या ठिकाणी २० वर्षांपासून वेगवेगळ्या विषयांवर भव्य रांगोळी साकारणारे विलास शेलार आणी त्यांचे सहकारी यावर्षी "ऑपरेशन सिंदुर" यावर भव्यदिव्य सुबक रांगोळी साकारणार आहेत. मंदीराच्या नवीन इमारतीतील सभा मंडप व मंदीराची इतर कामे युध्द पातळीवर सुरू असुन मंदीरात दर्शनासाठी येणाऱ्या शिवभक्ताना विविध सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कुंभेरेश्वर देवस्थान संस्थान सज्ज झाले आहे. यावेळी परिसरातील ५० ते ६० हजार भाविक दर्शनासाठी येतील असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

# श्रावणी सावंत हिची राष्ट्रीय स्केटिंग स्पर्धेत चमकदार कामगिरी




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर ग्रामीण(नरेंद्र पाटील)** : वासिंद येथील न्यू आयडियल स्कूल मध्ये इयत्ता सहावीत शिकणाऱ्या व स्केटिंग क्लब ,टिटवाळा येथे प्रशिक्षण घेणारी विद्यार्थ्यीनी श्रावणी तुषार सावंत हिने राष्ट्रीय स्केटिंग स्पर्धेत चमकदार कामगिरी केली आहे.

पुणे येथे पार पडलेल्या एन्ड्युरन्स राष्ट्रीय स्केटिंग स्पर्धेत श्रावणीने महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले होते. यामध्ये श्रावणी सावंत हिने तीन कांस्य पदक पटकावून ठाणे जिल्ह्याचे नाव लौकिक केले आहे. श्रावणी सावंत हिने आपल्या मेहनत, चिकाटी आणि कौशल्याचा जोरावर हे यश संपादन केले आहे. तसेच तिच्या या मिळालेल्या यशामुळे एन्ड्युरन्स जागतिक स्केटिंग स्पर्धेसाठी तिची निवड करण्यात आली आहे.

सदर, झालेल्या या स्पर्धेत देशभरातील 15 राज्यांमधील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. यासाठी तीला स्केटिंग प्रशिक्षक आदीत्य निकाळजी यांचे मार्गदर्शन लाभले तर शाळेचे प्राचार्य अरूण भोईर, शिक्षक-शिक्षिकेतर व विद्यार्थी -पालक वर्ग यांनी श्रावणी हिचे अभिनंदन करुन कौतुक केले आहे.

# जीवनदीपचा अभिमान सुवर्णपदकासह राष्ट्रीय पातळीवर झेप




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**खर्डी** : जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खर्डी येथील विद्यार्थ्यांनी आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. महाविद्यालयातील प्रसाद पोकळा (एम.ए. भाग १) याने इंटर कॉलेज ४ झोन स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले असून त्याची निवड अखिल भारतीय विद्यापीठ स्तरावरील स्पर्धेसाठी झाली आहे. त्याच्या या यशामुळे महाविद्यालयाचा लौकिक अधिक उंचावला आहे. तसेच साई सुंदरे (प्रथम वर्ष कला शाखा – FYBA) ह्याने ही संबंधित स्पर्धेत ५वा क्रमांक मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रविंद्र घोडविंदे, प्राचार्य डॉ. कैलास कलकटे, तसेच प्राध्यापकानी दोन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील यशासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या या दैदिप्यमान कामगिरीमुळे महाविद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# अडिवली येथील ऑस्टिन नगर रस्ता व रस्तालगत गटर बनविण्याची मागणी

## आई एकविरा महिला मंडळाचे केडीएमसी महापौरांना पत्र

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण पूर्वेतील मलंगरोडवरील अडिवली येथील ऑस्टिन नगर रस्ता व रस्तालगत गटर बनविण्याची, स्ट्रीट लाईट लावण्याची मागणी करण्यात आली असून याबाबत आई एकविरा महिला मंडळाच्या अध्यक्षा सोनी क्षीरसागर आणि संदीप क्षीरसागर यांनी केडीएमसी महापौर हर्षाली चौधरी यांची भेटून पत्र दिले आहे. गेल्या ६ ते ७ वर्षापासून अडिवली परिसरातील ऑस्टिन नगर, अंजनाबाई गॉर्डन, येथील रस्ता व रस्त्यालगत गटार बनविण्याकरिता व स्ट्रीट लाईट लावण्याकरिता कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त व शहरअभियंता तसेच खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्याकडे आई एकविरा महिला मंडळ वारंवार पत्राद्वारे पाठपुरवा करित आहे. मंडळाच्या वतीने पाठपुरावा करीत असताना वारंवार आयुक्त व शहर अभियंता यांच्याकडून निधीची




कमतरता असल्याचे त्यांच्याकडून उत्तर येत असून ऑस्टिन नगर, अंजनाबाई गॉर्डन, अडिवली येथील रस्त्याची अवस्थता खूपच बिकट झालेली आहे. मंडळाच्या वतीने दोन वेळा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या मुख्य प्रवेशद्वारा समोर निषेध व श्राध्द आंदोलन केले आहे. त्यामुळे या विभागाची पाहणी करुन तातडीने रस्ता व रस्त्यालगत गटार बनविण्याकरिता व स्ट्रीट लाईट लावण्याकरिता निधी उपलब्ध करण्याची मागणी आई एकविरा महिला मंडळाच्या वतीने महापौरांकडे करण्यात आली आहे.




# रायगड जिल्ह्यात 15 दिवस ध्वनीवर्धकांना मध्यरात्रीपर्यंत सूट

## जिल्हाधिकारी किशन जावळे यांचे आदेश

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण :** केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या ध्वनीप्रदूषण (नियमन व नियंत्रण) सुधारित नियम, २०१७ अन्वये जिल्ह्याच्या निकडीनुसार वर्षातील 15 दिवस ध्वनीवर्धक व ध्वनीक्षेपक वापरास सकाळी 6 ते रात्री 12 वाजेपर्यंत सूट देण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी रायगड, किशन जावळे यांनी दि.1 जानेवारी 2026 ते 31 डिसेंबर 2026 या कालावधीत 15 दिवसांकरिता ध्वनीवर्धक व ध्वनीक्षेपक वापरास सूट दिल्याची अधिसूचना जारी केली आहे.

या आदेशानुसार श्रोतृगृहे, सभागृहे, सामूहिक सभागृहे व मेजवानी कक्ष यांसारख्या बंद जागांखेरीज इतर ठिकाणी ध्वनीची विहित मर्यादा पाळून सकाळी 6 ते रात्री 12 वाजेपर्यंत ध्वनीवर्धक व ध्वनीक्षेपक वापरण्यास परवानगी देण्यात आली आहे. सूट देण्यात आलेले दिवस : शिवजयंती 19 फेब्रुवारी (1 दिवस), होळी पौर्णिमा 2 मार्च (1 दिवस), डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती 14 एप्रिल (1 दिवस), ईद-ए-मिलाद 26 ऑगस्ट (1 दिवस), गणपती उत्सव 15 सप्टेंबर (दुसरा दिवस), 19 सप्टेंबर (गौरी विसर्जन), 25 सप्टेंबर (अनंत चतुर्दशी) 3 दिवस, गणपती (साखरचौथ विसर्जन) 30 सप्टेंबर (1 दिवस), नवरात्री उत्सव 17 ते 20 ऑक्टोबर (4 दिवस), दिवाळी (लक्ष्मीपूजन) 8 नोव्हेंबर (1 दिवस), ख्रिसमस 25 डिसेंबर (1 दिवस),31 डिसेंबर – (1 दिवस). दरम्यान ही सूट राज्य शासनाने घोषित केलेल्या शांतता क्षेत्रात लागू राहणार नाही. ध्वनीप्रदूषण नियम, 2000 मधील तरतुदींचे उल्लंघन झाल्यास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडून पर्यावरण संरक्षण कायदा, 1986 च्या कलम 19 (अ) अन्वये आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# पान दिवड सापाला मिळाले जीवदान

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण पश्चिमेतील वाडेघर, पाणबुडी नगर येथे निर्माणधीन चाळीच्या मागील भागात पान दिवड जातीचा साप भक्ष्य गिळंकृत करण्याचा प्रयत्न करत होता. स्थानिक नागरिकांनी सर्पमित्र दत्ता बोंबे यांना फोन करून माहिती दिली ते तत्काळ दाखल झाले. बचावकार्य सुरू असताना त्यांना लक्षात आले की सापाच्या गळ्यात काहीसे धारदार जिववस्तू अडकली असून तो बाहेर



काढण्याचा प्रयत्न करत आहे परंतु असे झाले असते तर साप स्वतःच्या प्राणाला मुलाला असता.सर्पमित्र दत्ता बोंबे आणि हितेश करंजावकर यांनी वेळ न दवडता खाजगी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रायभोले यांच्या क्लिनिक मध्ये धाव घेतली. डॉक्टरांनी एंडोस्कोप कॅमेरा मधून निश्चित केले असता सापाच्या गळ्यात मासाचे खवले अडकल्याचे निश्चित झाले. डॉक्टरांनी अल्पावधीत अन्य सहकाऱ्यांच्या मदतीने वैद्यकीय उपचार करून अडकलेला भाग काढून सापाचा जीव वाचविण्यास मदत केली. उपचारानंतर पान दिवड सापाची काळजी घेऊन तथा शासकिय सोपस्कार पूर्ण करून निसर्गमुक्त करण्यात आले.

# शरीर सौष्ठव स्पर्धेत जीवनदीप महाविद्यालयाचा जीवन सपकाळ अव्वल

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली** : दि. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रगती महाविद्यालय, डोंबिवली येथे पार पडलेल्या मुंबई विद्यापीठ अंतर्गत विद्यापीठस्तरीय शरीर सौष्ठव स्पर्धेत जीवनदीप महाविद्यालय, गोवेली च्या विद्यार्थ्याने सुवर्ण कामगिरी नोंदवत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. महाविद्यालयाचा विद्यार्थी कुमार जीवन सपकाळ याने ९० किलो वजनी गटात दमदार प्रदर्शन करत




सुवर्णपदक पटकावले. उत्कृष्ट शरीरयष्टी, संतुलित सादरीकरण आणि आत्मविश्वासपूर्ण कामगिरीच्या जोरावर त्याने प्रतिस्पर्ध्यांवर मात करत अव्वल स्थान मिळवले. या उल्लेखनीय यशामुळे त्याची मुंबई विद्यापीठ बॉडी बिल्डिंग संघ मध्ये निवड झाली आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. रविंद्र घोडविंदे, संचालक प्रशांत घोडविंदे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक डी. वाघ, उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे तसेच क्रीडा शिक्षक मोहनिष देशमुख यांनी त्याचे विशेष अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयातील प्राध्यापकवर्गानेही त्याच्या यशाचे कौतुक केले. संपूर्ण महाविद्यालय परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून नातेवाईक, मित्रपरिवार आणि विद्यार्थ्यांकडून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. कुमार जीवन सपकाळ याच्या या यशामुळे जीवनदीप महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.

# वाड्यात मराठा सेवा संघाची नवी कार्यकारिणी जाहीर

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**वाडा** : गुरुवार १२ जानेवारी २०२६ रोजी वाड्यात मराठा सेवा संघाची पदाधिकारी निवड संदर्भात बैठक पार पडली. जिल्हाध्यक्ष शिवश्री मयूर चव्हाण ह्यांच्या सूचनेनुसार ही बैठक घेण्यात आली. तालुका अध्यक्ष म्हणून कल्पेश ठाणगे, कार्याध्यक्ष पदी डॉ. सचिन इंगोले, उपाध्यक्ष पदी किशोर काठोले, मनीषा भालेराव, सचिव पदी अंबादास जमादार, सहसचिव पदी अनिल बरफ, महिला अध्यक्ष पदी अंजली कोकणे, प्रवक्ते पदी डॉ. बसवेश्वर पंडागळे, कोषाध्यक्ष पदी सूरज काळे तर प्रसिद्धी प्रमुख



पदी सिद्धार्थ गायकवाड, रोहीत धूम ह्यांची निवड करण्यात आली. सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र, पुस्तक व गुलाबपुष्प देत शुभेच्छा देण्यात आल्या. ह्या नियुक्त्या मराठा सेवा संघांचे जिल्हा कार्याध्यक्ष शिवश्री वैभव शिंदे, सचिव शिवराज डावले, माजी जिल्हाध्यक्ष सुनिल (नाना ) अहिरे, तेजस भोईर, मनोहर देशमुख ह्यांच्या उपस्थितीत करण्यात आल्या. वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना मराठा सेवा संघाच्या कार्याची माहिती दिली, मार्गदर्शन केले. सर्व नवनियुक्त पदाधिकारी ह्यांनी नियुक्ती बाबत आभार व्यक्त करीत सेवा संघांचे कार्य चांगल्या पद्धतीने पुढे घेऊन जाण्याचे आश्वासित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सेवा संघांचे माजी जिल्हा प्रवक्ते नवनाथ शिंदे ह्यांनी केले, तर अंजली कोकणे ह्यांनी उपस्थितांचे आभार मानले. हा नवनियुक्त पदाधिकारी सोहळा शासकीय विश्रामगृह वाडा येथे मोठ्या उत्साहात पार पडला.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024